# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.01.2026** **वार- शनिवार**

---

**निवड**

राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांना आज मुंबईत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शपथ दिली. तत्पूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची बैठक आज मुंबईत झाली. अजित पवार यांच्या निधनामुळं रिक्त झालेल्या विधीमंडळ पक्षनेतेपदी सुनेत्रा पवार यांची निवड एकमतानं झाली. दिलीप वळसे-पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला तर छगन भुजबळ यांनी त्याला अनुमोदन दिलं. तत्पूर्वी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा खासदार पदाचा राजीनामा दिला आहे.

**मतदान**

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या मतदानासाठी जिल्हा प्रशासनानं राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 30 टक्के अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून दिलं आहे. निवडणुकीच्या तारखेत बदल करण्यात आला असून, आता ही निवडणूक 7 फेब्रुवारीला होणार आहे. जिल्ह्यात एकंदर 3 हजार 605 मतदान केंद्र स्थापन केली आहेत. इंदापूर तालुक्यात सर्वाधिक 400 मतदान केंद्र, तर वेल्हा तालुक्यात 105 मतदान केंद्र आहेत. या सर्व मतदान केंद्रावरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कामासाठी नियुक्तीचे आदेश जिल्हा प्रशासनानं दिले आहेत.

**कर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत 26 जानेवारी ते 1 फेब्रुवारी या काळात "कर वसुली सप्ताह" राबवला जात आहे. या कालावधीत सर्व नागरिकांनी आपले प्रलंबित घरपट्टी, पाणीपट्टी आणि इतर करांचा भरणा करून आपल्या गावाच्या विकासात हातभार लावा असं आवाहन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी केलं आहे. ग्रामपंचायतीला या करांची आकारणी करण्याचा अधिकार आहे, त्याद्वारे गावातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, शाळा आणि इतर मूलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध होतो. सप्टेंबरपूर्वी कर भरल्यास त्यात नागरिकांना ५ टक्के सूट मिळते.

**काव्य**

कविता म्हणजे एक सत्यशोधनच असते. परिवर्तनशीलतेची ताकद शब्दात असते असं मत साहित्यिका प्राध्यापक डॉक्टर सिसिलिया कार्व्हालो यांनी आज पुण्यात, साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे आयोजित “दोन दिवस कवितेसाठी” या काव्य महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरुन बोलताना व्यक्त केलं. संमेलनाचं उद्घाटन भाषा अभ्यासक डॉक्टर नीलिमा गुंडी यांच्या हस्ते करण्यात आलं. महोत्सवाचं यंदा दुसरं वर्ष आहे. उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना डॉक्टर नीलिमा गुंडी म्हणाल्या की, काव्य महोत्सवाच्या माध्यमातून कवितेचा गौरव आणि वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कार्य घडत आहे. कविता ही सांस्कृतिक संपन्नता ओळखण्याचा महत्त्वाचा घटक असल्यानं त्याची निगराणी, जपणूक करण्याचं कार्य होणं आवश्यक आहे.

**स्वच्छता**

कचरा संकलनासाठी येणाऱ्या घंटागाडीमध्येच कचरा द्यावा असं आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागानं केलं आहे. महापालिकेच्यावतीनं शहरातील सर्व प्रभागांमध्ये ही जनजागृती मोहीम राबवली जात आहे.

**काळाघोडा**

मुंबईत साजरा होणाऱ्या काळा घोडा कला महोत्सवासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चार प्राथमिक शाळांची निवड झाली आहे. यामध्ये जाधववाडीतील साई जीवन प्राथमिक कन्या शाळा, किवळे मधील श्री बापदेव महाराज प्राथमिक शाळा,थेरगावची यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळा आणि इंद्रायणीनगरची श्री वैष्णो माता प्राथमिक विद्यामंदिर, या शाळा निवडण्यात आल्या आहेत. हा कला महोत्सव आजपासून आठ फेब्रुवारीपर्यंत दक्षिण मुंबईतील ऐतिहासिक काळा घोडा परिसरात आयोजित करण्यात आला आहे. त्यामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विद्यार्थ्यांनी साकारलेली कला मॉडेल्स प्रदर्शनासाठी ठेवली जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी मानवी मनातील चढउतार, जीवनातील बदल आणि शहराच्या विकासाच्या कल्पना या मॉडेल्समध्ये प्रभावीपणे मांडल्या आहेत.

**भवन**

पुण्यातील बालेवाडी-म्हाळुंगे इथं शिवछत्रपती क्रीडा नगरीत उभारण्यात येत असलेल्या नियोजित महाराष्ट्र ऑलिम्पिक भवनला महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे दिवंगत अध्यक्ष माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं नाव देऊन क्रीडा क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची स्मृति कायम राखावी अशी मागणी पुणे हौशी ॲथलेटिक संघटनेचे अध्यक्ष अभय छाजेड यांनी आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. भारतीय ऑलिंपिक महासंघाचे माजी अध्यक्ष सुरेश कलमाडी यांची स्मृती जतन करण्यासाठी पुण्यात दरवर्षी होणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन यापुढे दिवंगत सुरेश कलमाडी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा म्हणून ओळखली जाईल असे पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ट्रस्टचे विश्वस्त म्हणून छाजेड यांनी जाहीर केलं. पुणे हौशी ॲथलेटिक संघटनेतर्फे पुण्यातील सणस मैदानावर उपकनिष्ठ क्रीडा स्पर्धांना आज प्रारंभ झाला त्यावेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

**कालिकादिन**

त्वष्टा कासार समाज संस्था आणि तांबा पितळ भांडी उत्पादक संस्था यांच्या वतीनं महाकालिका स्थापना दिनाचा एकशे आठवा वर्धापन दिन काल साजरा झाला. त्यानिमित्तानं पालखीतून देवीची नगर प्रदक्षिणा, अभिषेक, श्री विश्वकर्मा पूजन, भजन, महाकालीका आरती  करण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 32 अंश तर किमान 19 अंश सेल्सियस तापमानाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आकाश दुपारनंतर ढगाळ होण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**